कायदेविषयक मार्गदर्शन मोफत

संपर्क
अॅड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१



RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

शुक्रवार २१ ऑगस्ट २०२६ | वर्ष : ६ | अंक : २३१ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Friday, 21 August 2026 | Year : 6 | Issue : 231 | Daily | Rate: Rs. 5/-


**दि. २१ ऑगस्ट २०२६**



१९३६- श्रीलंकेचे भिक्खू लोकनाथ यांचे बौद्ध धम्म स्वीकारण्याबद्धल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पत्र.
१९४९- हिंदू कोड बीलाला पाठिंबा देण्यासाठी भंडारी हॉल दादर येथे परिषद.
१९१७- बडोदा सरकारच्या शिष्यवृत्तीची मुदत संपल्याने अभ्यासक्रम अर्धवट सोडून भारतात परतावे लागले.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

# सरकारी शाळांच्या दुरवस्थेवर अभिजीत दीपके आक्रमक

## शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या राजीनाम्याची मागणी

**लातूर :** महाराष्ट्रातील सरकारी शाळांच्या दुरवस्थेचा मुद्दा उपस्थित करत कॉकरोच जनता पार्टीचे (CJP) संस्थापक अभिजीत दीपके यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. त्यांच्या 'स्कूल ठीक करो' अभियानांतर्गत लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील उजनी येथील जिल्हा परिषद शाळेला त्यांनी भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली.

सरकारी शाळांमध्ये आजही विद्यार्थ्यांना पक्क्या वर्गखोल्या, पुरेसे बाक-डेस्क, स्वच्छतागृहे आणि सुरक्षित परिसर यांसारख्या मूलभूत सुविधा मिळत नसल्याचा आरोप दीपके यांनी केला. या परिस्थितीसाठी त्यांनी लोकप्रतिनिधी आणि सरकारला जबाबदार धरले. "मंत्र्यांच्या मुलांनी सरकारी शाळेत शिकावे" शिक्षण व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करताना दीपके यांनी मंत्री आणि आमदारांनी आपल्या मुलांना सरकारी शाळांमध्ये शिकवावे, अशी मागणी केली. सरकारी शाळांमध्ये आपल्या मुलांनी शिक्षण घेतले तर या शाळांमधील समस्यांची जाणीव लोकप्रतिनिधींना प्रत्यक्ष होईल आणि व्यवस्था सुधारण्यासाठी ते अधिक गांभीर्याने प्रयत्न करतील, असे त्यांनी म्हटले. सरकार अनेक वर्षांपासून सत्तेत असूनही शाळांमधील मूलभूत समस्या दूर झालेल्या नाहीत. पावसाळ्यात गळणाऱ्या छताखाली आणि अपुऱ्या सुविधांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला."धर्माच्या नावावर राजकारण करण्याऐवजी नेत्यांनी शिक्षणाचा प्रश्न



प्राधान्याने सोडवावा," असे आवाहन दीपके यांनी ग्रामस्थांना केले. निवडणुकीच्या काळात मत मागण्यासाठी येणाऱ्या नेत्यांना त्यांच्या गावातील शाळेसाठी त्यांनी काय केले, याचा जाब विचारावा, असेही त्यांनी सांगितले.

हिंगोली जिल्ह्यातील शाळांच्या पाहणीदरम्यान विद्यार्थ्यांकडून वर्ग साफ करून घेतल्याचा प्रकार तसेच पिण्याच्या पाण्याची आणि इमारतीच्या दुरवस्थेची समस्या दीपके यांनी समोर आणली होती. काही ठिकाणी ग्रामस्थांनी स्वतःच्या पैशातून शाळेच्या मूलभूत सुविधांसाठी खर्च केल्याचा दावाही त्यांनी केला.

सरकारी शाळांची अशी अवस्था असेल तर राज्याच्या शिक्षण व्यवस्थेची जबाबदारी कोणाची, असा सवाल करत दीपके यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. सरकारी शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी सरकारने ठोस आणि तातडीची पावले उचलावीत, अशी त्यांची मागणी आहे.

दीपके यांच्या अभियानानंतर काही ठिकाणी शाळांच्या दुरुस्तीची कामे सुरू झाली असून, काही शाळांना नवीन बाक-डेस्क आणि संगणक उपलब्ध झाल्याचेही त्यांनी सांगितले आहे. मूलभूत सुविधा ही विद्यार्थ्यांची गरज असून ती सरकारची जबाबदारी आहे. त्यामुळे सरकारी शाळांचा दर्जा सुधारण्याचा प्रश्न आता केवळ शिक्षण विभागापुरता न राहता राजकीय उत्तरदायित्वाचा मुद्दा बनला आहे.

### शिक्षकांना फक्त शिकवण्याचे काम द्या; अभिजीत दीपके

**लातूर :** शिक्षकांना शिक्षणाचे काम सोडून विविध शासकीय कामांमध्ये गुंतवण्यावर कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजीत दीपके यांनी सरकारवर टीका केली आहे. "शिक्षकांना फक्त शिकवण्याचेच काम करू द्या. 'एसआयआर' करायचे असेल तर त्यासाठी सरकारने स्वतंत्र भरती करावी. त्यामुळे बेरोजगारीही कमी होईल," असा सवाल त्यांनी केला. लातूर जिल्ह्यातील उजनी येथील शाळेला भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केल्यानंतर दीपके यांनी ही भूमिका मांडली. शिक्षकांच्या मागे विविध प्रकारची अनेक कामे लावली जात असल्यामुळे त्यांचा प्रत्यक्ष अध्यापनासाठीचा वेळ कमी होत असल्याचे त्यांनी म्हटले. अनेक शिक्षकांना शाळेत येऊन विद्यार्थ्यांना शिकवायचे आहे; मात्र शासनाकडून त्यांच्याकडून अन्य कामे करून घेतली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. उजनी येथील शाळेतील मूलभूत सुविधांच्या अभावाकडेही दीपके यांनी लक्ष वेधले. शाळेच्या स्वच्छतागृहात नळाचे पाणी नाही, वर्गखोल्यांमध्ये फळा आणि साधे टेबलदेखील उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले. "अशा परिस्थितीत मुलांना शिक्षण घ्यावे लागत आहे," असे सांगत त्यांनी शिक्षण व्यवस्थेच्या दुरवस्थेवर प्रश्न उपस्थित केला. जात आणि धर्माच्या राजकारणासाठी नागरिक रस्त्यावर उतरतात; मग गावातील शाळा सुधारण्यासाठीही एकत्र का येऊ नये, असा सवाल दीपके यांनी ग्रामस्थांना केला. शाळेची अवस्था सुधारण्यासाठी बाहेरून कोणी येण्याची वाट पाहण्याऐवजी गावकऱ्यांनीच एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

## महत्वाच्या बातम्या

### ३५ वर्षांनंतर बांगलादेशात राष्ट्रपती निवडणूक

**नवी दिल्ली :** बांगलादेशला नवे राष्ट्रपती मिळाले आहेत. सत्ताधारी बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे (बीएनपी) ज्येष्ठ नेते मिर्झा फखरुल इस्लाम आलमगीर यांनी निवृत्त कर्नल ओली अहमद यांचा पराभव करून राष्ट्रपतीपदाची निवडणूक जिंकली आहे. ही निवडणूक अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण होती. बांगलादेशमध्ये ३५ वर्षांनंतर थेट राष्ट्रपतीपदाची निवडणूक झाली. १९९१ नंतर प्रथमच या पदासाठी दोन उमेदवार एकमेकांसमोर उभे ठाकले होते. अलिकडच्या वर्षांत, राष्ट्रपतीपदाच्या निवडणुका बहुतांशी एकमताने किंवा बिनविरोध होत आल्या आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, मिर्झा फखरुल इस्लाम आलमगीर यांना २५५ मते मिळाली, तर त्यांचे प्रतिस्पर्धी ओली अहमद यांना ८८ मते मिळाली. याचा अर्थ आलमगीर १६७ मतांच्या फरकाने विजयी झाले.

### विदर्भातील ७,८६४ शाळांमध्ये बायोमेट्रिक अपडेटचा 'बॅकलॉग'



**नागपूर :** मुलांच्या आधार कार्डमध्ये वयाची ५ आणि १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर अनिवार्य बायोमेट्रिक अपडेट करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया सुलभकरण्यासाठी डाक विभागाच्या वतीने विदर्भातीलशाळांमध्येच आधार बायोमेट्रिक अपडेट करण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित केली जात आहेत. मात्र, या सुविधेनंतरही मोठ्या संख्येने शाळांमधील विद्यार्थ्यांचे आधार अद्याप अपडेट झालेले नाहीत. डाक विभागाने १ एप्रिल ते १७ऑगस्ट दरम्यान विदर्भात एकूण २१५ आधार अपडेट शिबिरे आयोजित केली. या शिबिरांच्या माध्यमातून ४,०७७ विद्यार्थ्यांचे आधार अपडेट करण्यात आले आहेत. डाक विभागाच्या नागपूर शहर, नागपूर ग्रामीण, अकोला, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, वर्धा आणि यवतमाळ विभागातील एकूण ८,३२० शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे आधार बायोमेट्रिक अपडेट करणे अपेक्षित आहे. मात्र, आतापर्यंत केवळ ४५६ शाळांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तब्बल ७,८६४ शाळांमधील विद्यार्थी अद्याप आधार अपडेटपासून वंचित आहेत.

### एसटी सहकारी बँकेतील ३४ कोटींच्या कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याची मागणी



**मुंबई :** स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेतील विविध खरेदी प्रक्रियेत सुमारे ३४ कोटी रुपयांचा कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने केला. या प्रकरणाची आर्थिक गुन्हे शाखा (ईओडब्ल्यू) व लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सखोल चौकशी करावी, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने बुधवारी दादर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केली.

### रघुराम राजन यांनी एआय कराचा दिला प्रस्ताव




**नवी दिल्ली:** अलिकडच्या वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर झपाट्याने वाढला आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्या जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी एआय कराची सूचना केली आहे. यानुसार, कंपन्या जेव्हा मानवी कामाची जागा घेण्यासाठी एआयचा वापर करतील, तेव्हा त्यांना जास्त कर भरावा लागू शकतो. त्यांनी असा प्रस्ताव दिला आहे की, एआयच्या वापरावर सुरुवातीला कमी दराने कर आकारला जावा आणि नंतर तो वाढवला जावा. 'हाऊ कॉर्पोरेशन्स कॅन मिटिगेट अॅन एआय जॉबोकॅलिप्स' या नुकत्याच प्रकाशित झालेल्या लेखात, रघुराम राजन यांनी सुचवले आहे की, सरकार कंपन्यांद्वारे वापरल्या जाणाऱ्या एआय टोकन्सवर कर लावू शकते आणि कंपन्यांना कामगारांना पुन्हा प्रशिक्षित करण्यासाठी व टिकवून ठेवण्यासाठी प्रोत्साहनपर योजना देऊ शकते.

# अडीच अब्ज लोकांबद्दलचे सत्य कोणाला कसे कळणार?' राहुल गांधीं



**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिल्लीत आयोजित 'ग्रीन स्वराज्यः राजीव गांधींच्या दूरदृष्टीला आदरांजली' या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर निशाणा साधला. ते म्हणाले की, देशाच्या दीड अब्ज लोकसंख्येबद्दलचे सत्य आपल्यालाच माहीत आहे, असे गृहीत धरण्याचा अधिकार कोणत्याही एका गटाला किंवा व्यक्तीला नाही. राहुल गांधी म्हणाले, *'हीच माझी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दलची अडचण आहे. दीड अब्ज लोकांबद्दलचे सत्य आपल्यालाच माहीत आहे, असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने ठरवले आहे. मी म्हणतो की, केवळ दीड अब्ज लोकांनाच त्यांचे स्वतःचे सत्य माहीत असू शकते.'* ते म्हणाले की, जर त्यांनी दुसऱ्या व्यक्तीबद्दलचे सत्य आपल्याला माहीत आहे असे गृहीत धरले, तर ते चुकीचे ठरेल, कारण त्यांनी त्या व्यक्तीचे अनुभव आणि परिस्थिती पाहिलेली नाही.

भारताची खरी वैचारिक लढाई कोणती आहे? राहुल गांधी म्हणाले की, देशातील वैचारिक लढाई आज पर्यावरण, राजकारण किंवा स्वतंत्र माध्यमे यांसारख्या मुद्द्यांपुरती मर्यादित नाही. त्यांच्या मते, खरा प्रश्न हा आहे की, देशातील प्रत्येक व्यक्तीबद्दलचे सत्य आपल्यालाच माहीत आहे, असे कोणताही गट ठरवू शकतो का. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांसंदर्भात केलेल्या वक्तव्याचा संदर्भ देत ते म्हणाले की, 'मला सर्व काही माहीत आहे, तुम्हाला काहीच माहीत नाही,' असा संदेश देण्याचा हा प्रयत्न आहे. राहुल गांधी म्हणाले की, जर देशातील प्रत्येक व्यवसाय एकाच व्यक्तीच्या मालकीचा असेल, तर बहुसंख्य जनतेसाठी स्वराज्य शक्य नाही. ते म्हणाले, ]जर या देशातील प्रत्येक व्यवसाय एकाच व्यक्तीच्या मालकीचा असेल, तर बहुसंख्य भारतीय जनतेसाठी स्वराज्याची कोणतीही शक्यता नाही.' राहुल गांधी म्हणाले की, देशातील काही लोकांच्या मालकीचे विमानतळ, बंदरे आणि कंपन्या असाव्यात, तर इतर नोकरशहा असावेत, जे आपले विचार मुक्तपणे मांडू शकतील आणि कोणत्याही व्यावसायिकाच्या प्रभावाखाली काम करण्यास भाग पाडले जाणार नाहीत.

राहुल गांधी म्हणाले की, काही मूलभूत प्रणालींशिवाय गांधीजींची दूरदृष्टी साकार होऊ शकत नाही. त्यांनी महागड्या शिक्षण प्रणालीवर आणि असमान परीक्षा पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, दोन-तीन लोकांच्या मक्तेदारी असलेल्या आर्थिक प्रणालीमुळे ही दूरदृष्टी साकार होणेही अशक्य आहे. राजकीय व्यवस्था गावांपर्यंत आणि पंचायतींपर्यंत पोहोचण्याच्या गरजेवर राहुल गांधींनी भर दिला. त्यांनी पंचायती राज, आमदार आणि खासदार यांचाही उल्लेख केला.

### राहुल गांधींनी भाजप आणि आरएसएसवर केलेले आरोप ?

**राहुल गांधी यांनी समाजातील विविध घटकांसंदर्भात भाजप आणि आरएसएसवर निशाणा साधला. देशातील मुस्लिम, ख्रिश्चन आणि शीख समुदायांना 'आपले अस्तित्वच नाही' असा संदेश दिला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांनी आदिवासी आणि दलितांच्या बाबतीतही भाजप आणि आरएसएसवर आरोप केले. राहुल गांधी म्हणाले की, आदिवासींना त्यांच्या जमिनीच्या मुद्द्यांवर आणि दलितांना जातीय भेदभावाच्या मुद्द्यांवर दडपले जात आहे. देशातील ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.**

## जंतर मंतर आंदोलन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केली ५ सदस्यीय समिती स्थापन



**नवी दिल्ली :** पोलीस, निमलष्करी दल आणि इतर सुरक्षा कर्मचाऱ्यांकडून आंदोलकांविरुद्ध अतिरिक्त बळाचा वापर केल्याच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने पाच सदस्यीय उच्चाधिकार चौकशी समिती (HPEC) स्थापन केली आहे. या समितीचे अध्यक्षपद सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी भूषवतील. पाच सदस्यीय समितीत न्या. आर. सुभाष रेड्डी, पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश रवी शंकर झा आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश शालिंदर कौर यांचा समावेश आहे. माजी सीबीआय संचालक ऋषी कुमार शुक्ला आणि मेघालयचे निवृत्त पोलीस महासंचालक डॉ. एल.आर. बिश्नोई हे देखील सदस्य आहेत.

समिती केवळ आंदोलकांच्या तक्रारींपुरतीच मर्यादित राहणार नाही. पोलीस कर्मचाऱ्यांवरील हिंसाचार आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान यांसंबंधी अधिकाऱ्यांनी केलेल्या आरोपांचाही ती विचार करेल. अशाप्रकारे, समिती आंदोलनादरम्यान सुरक्षा दलांच्या कृती आणि अधिकाऱ्यांनी केलेले संबंधित आरोप या दोन्हींची तपासणी करेल.

### आंदोलकांविरुद्ध बळाचा वापर केल्याच्या कोणत्या आरोपांची चौकशी केली जाईल?

**ही समिती आंदोलकांविरुद्ध पेलेट गन, इलेक्ट्रिक बॅटन, लाठीचार्ज आणि अश्रुधूर यांच्या अतिवापराच्या आरोपांची चौकशी करेल. महिला आंदोलकांवरील हिंसाचार आणि पोलिसांच्या पाळत ठेवण्याच्या आरोपांचीही ती तपासणी करेल. आंदोलकांना नियंत्रणात आणण्यासाठी सुरक्षा दलांनी उचललेली पाऊले परिस्थितीच्या प्रमाणात होती की नाही, हेदेखील ती तपासेल. जखमींना देण्यात आलेली वैद्यकीय मदत आणि पीडितांना देण्यात आलेली नुकसान भरपाई यांचीही ती तपासणी करेल.**

## आमदारांना अपात्र ठरवण्याचा सुप्रीम कोर्टाला अधिकार : देवदत्त कामत



**मुंबई :** शिवसेना पक्ष आणि चिन्ह याबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान आज उद्धव ठाकरेंच्यावतीने ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी युक्तिवादाला सुरुवात केली असून, आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाला असलेल्या अधिकारांबाबत युक्तिवादारदम्यान मोठे भाष्य केले आहे. उद्धव ठाकरे आणि उद्धवसेनेच्या वकिलांकडून युक्तिवादाच्या अखेरच्या टप्प्यात केलेल्या या युक्तिवादामुळे आमदार अपात्रतेबाबतच्या सुनावणीला वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे आणि उद्धवसेनेच्यावतीने युक्तिवादाला उभे राहिल्यावर ज्येष्ठ वकील कामत यांनी सुरुवातीला सुभाष देसाई प्रकरणातील काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा हवाला दिला. तसेच आमदारांना अपात्र ठरवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाला अधिकार असल्याचे नमूद केले. तसेच या संदर्भातील काही उदाहरणेही खंडपीठासमोर मांडली. त्यानंतर खंडपीठानेही आमदारांना अपात्रतेसंदर्भात आम्हाला अधिकार आहेत, यात शंका नाही, हे मान्य केले. आजच्या सुनावणीवेळी देवदत्त कामत यांनी विधानसभा अध्यक्षांनी आमदार अपात्रतेसंदर्भात घेतलेल्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विधानसभा अध्यक्षांनी हे प्रकरण व्यवस्थितपणे हाताळले नाही. विधानसभा अध्यक्षांवरील आमचा विश्वास उडाला आहे, असेही कामत यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर सांगितले. दरम्यान, शिवसेनेच्या धनुष्यबाण ह्या चिन्हाबाबत युक्तिवाद करताना देवदत्त कामत यांनी एखाद्या पक्षातील पाच पैकी ३ आमदार फुटले तर त्यांना पक्ष देणार का? असा प्रश्न विचारला. विधानसभा अध्यक्षांनी अपात्रतेचा निर्णय देण्याआधीच निवडणूक आयोगानं पक्ष आणि चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला दिलं, आसा आरोप कामत यांनी केला. तसेच जर धनुष्यबाण हे चिन्ह दोघांपैकी कुणालाही द्यायचे नसेल तर हे चिन्ह गोठवा अशी मागणी केले.

## JPSC-JSSC भरती रद्द करण्याच्या आदेशाला हायकोर्टाची स्थगिती




**रांची :** झारखंडमधील लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. झारखंडउच्चन्यायालयानेजेएसएससी आणि जेपीएससीपरीक्षांशी संबंधित नियुक्त्या रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या आदेशाला स्थगिती दिली आहे.

या न्यायलयीन निर्णयामुळे भरती प्रक्रियेत सहभागी असलेल्या आणि आपल्या भविष्याबद्दल चिंतित असलेल्या उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. विविध जेएसएससी आणि जेपीएससी परीक्षांची भरती प्रक्रिया रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या अलीकडील निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. सरकारचा निर्णय मनमानी होता आणि त्याचा पात्र उमेदवारांच्या भविष्यावर परिणाम झाला. एखाद्या चळवळीच्या दबावाखाली घेतलेला निर्णय समर्थनीय नाही, असा याचिकाकर्त्यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून झारखंड उच्च न्यायालयाने नियुक्त्या रद्द करण्याच्या सरकारच्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिली आहे. न्यायालयाच्या या भूमिकेवरून हे स्पष्ट होते की, सरकारला आता या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट करावी लागेल. या निर्णयामुळे राज्यातील प्रशासकीय वर्तुळात आणि विद्यार्थ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. सरकारने नैसर्गिक न्यायाचे पालन केले नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे आदेशाला स्थगिती देण्यात येत आहे. पुढील सुनावणी १५ सप्टेंबर रोजी होईल. तोपर्यंत राज्य सरकारकडून प्रतिसाद मागितला आहे. नेमकी चूक कोणाची झाली, याबाबत अद्याप कोणताही ठोस पुरावा समोर आलेला नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

# 'जनरेशन जी' नंतर 'जनरेशन अल्फा' उतरली रस्त्यावर




नवी दिल्ली : अलीकडेच, देशभरातील 'जनरेशन झेड'च्या विद्यार्थ्यांनी नीट पेपरफुटीविरोधात आंदोलन केले. आपल्या मागण्यांवरून सुरू झालेले हे आंदोलन, जोपर्यंत त्यांच्या मागण्यांवर कारवाई झाली नाही तोपर्यंत थांबले नाही. आता देशाच्या विविध भागांमध्ये 'जनरेशन अल्फा'च्या विद्यार्थ्यांमध्येही अशीच आंदोलने होताना दिसत आहेत. गेल्या काही दिवसांत, झारखंड, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, बिहार, पंजाब आणि महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी शाळकरी मुलांनी आंदोलने केल्याचे वृत्त आहे. यामुळे एक प्रश्न निर्माण होतोः ही 'जनरेशन अल्फा' कोण आहेत आणि देशाच्या विविध भागांमध्ये या मुलांना आंदोलन करण्याची गरज का वाटत आहे? २०१२ ते २०२४ दरम्यान जन्मलेल्या मुलांना 'जनरेशन अल्फा' म्हटले जाते. ही पिढी जन्मापासूनच इंटरनेट, स्मार्टफोन, सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांच्या सभोवतालच्या वातावरणात वाढली आहे. या पिढीतील मुलांनी तंत्रज्ञान नंतर स्वीकारले नाही, तर त्यांच्या बालपणीचा बराचसा काळ डिजिटल जगात रमून घालवला आहे. टॅब्लेट, व्हिडिओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म, ऑनलाइन शिक्षण, व्हिडिओ कॉल, व्हर्च्युअल क्लासरूम आणि स्मार्ट उपकरणे या त्यांच्यासाठी सर्वसामान्य गोष्टी आहेत.

'जनरेशन अल्फा' ही संज्ञा सर्वप्रथम २००८ मध्ये ऑस्ट्रेलियन संशोधक मार्क मॅकक्रिंडल यांनी वापरली. जनरेशन एक्स, जनरेशन वाय (मिलेनियल्स) आणि जनरेशन जी यांच्यानंतर, इंग्रजी वर्णमालेऐवजी ग्रीक वर्णमालेतील अक्षरावरून नाव दिलेली ही पहिली पिढी आहे.

जनरेशन Z नंतर, जनरेशन अल्फा रस्त्यावर का उतरत आहे, आणि त्याचा काय परिणाम होऊ शकतो? मुख्याध्यापक, मलय कुमार सिंग यांच्या बदलीला विरोध केला. त्यांच्या मते, त्यांच्या आगमनापासून शाळेतील शैक्षणिक आणि शिस्तीचे वातावरण सुधारले होते. त्यामुळे, त्यांची बदली विद्यार्थ्यांच्या हिताची होती. परिस्थिती चिघळताच, शेकडो विद्यार्थी रस्त्यावर उतरले, त्यांनी मुख्य रस्ते अडवले आणि निषेध म्हणून टायर जाळले. विद्यार्थी केवळ स्थानिक आंदोलनांपुरते थांबले नाहीत; एक शिष्टमंडळ सुमारे १०० किलोमीटर दूर असलेल्या गरवा येथील जिल्हा मुख्यालयात गेले आणि त्यांनी आपल्या मागण्या मांडण्यासाठी उपआयुक्तांची भेट घेतली. जोपर्यंत मुख्याध्यापकांना पुन्हा पदावर रुजू केले जात नाही, तोपर्यंत आपले आंदोलन सुरूच राहील, असे त्यांनी जाहीर केले. विद्यार्थ्यांच्या दबावानंतर, शिक्षण विभागाने १३ ऑगस्ट रोजी एक आदेश जारी करून मलय कुमार सिंग यांना कांडी हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून पुन्हा नियुक्त केले. याचा अर्थ प्रशासनाला विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर निर्णय घ्यावा लागला.

उत्तर प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या मागणीसाठी आंदोलन सुरू आहे. हमीरपूर जिल्ह्यातील शाळकरी मुलांनी त्यांच्या शाळेकडे जाणाऱ्या खराब रस्त्याविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. भाऊली आणि बछरौली गावातील मुलांनी सांगितले की, त्यांच्या शाळेकडे जाणारा रस्ता बऱ्याच काळापासून खराब अवस्थेत आहे.


बहुजन सौरभ

## इथे संपर्क साधावा

**प्रवीण गायकवाड**
09850301528
विश्वकर्मा नगर, कुकडे लाऊड, वंजारीनगर, एम्प्रेस मिल कॉलनी

**निलेश कांबळे**
मो. 94236 34976
**एरिया :** उंटखाना, दत्तात्रयनगर, सुभेदार ले आउट , म्हाळगीनगर

**सुनील कुंभारे**
मो. 98238 94329

**विशाखा नारायणे**
मो. 99602 41648
**एरिया :** जोगी नगर , काशी नगर, धाडीवाल ले आऊट, सुयोग नगर, रानवाडी

**प्रमोद चहांदे**
मो. 9273170800
जोगी नगर, धाडीवाल ले आऊट, संयोग नगर, नरेंद्र नगर,

**चंदू नगरारे**
मो. 9975968852
शताब्दी नगर, काशी नगर, अभयनगर, जयवंतनगर, भीम नगर, जोगी नगर.

**निलेश वालदे**
मो.9764772886
मोहन नगर. गौतम नगर, गड्डीगोदाम परिसर

**मसारकर**
मो. 918080158604
धाडीवाल ले आउट.

**लिना विनोद भोवते**
मो.9021770694
इंदोरा, जरीपटका, भीमचौक, नाराघाट.

**प्रविण राजाराम ठवरे**
मो. 9372331798
मॉडेल टॉऊन, बेझनबाग.

**रितेश अनिल बोदेले**
मो. 9511843694
WCL पॉव ग्रीड

**गगन प्रताप नाहारकर**
मो. 8793389936
मेकोसाबाग, नवा नकाशा.

**प्रमोद बागडे**
मो. 9764973627
इंदोरा, सुगत नगर.

**बी प्रकाश राव**
मो. 9022621075
भीमचौक, बेझनबाग, मेकोसाबाग.

**पुष्पीत कराडे**
मो. 8055416108
वैशाली नगर, राणी दुर्गावती चौक.

**राहुल राजकुमार जांबुळकर**
मो. 9673392025, नारी.

**श्रीकांत वासनिक**
मो. 9767624345
काचीपूरा, बाबूळखेडा, पार्वती नगर, रमा नगर, जय भिम नगर.

**मंगेश शंभरकर**
मो. 9970258703
नरेंद्र नगर, सुयोग नगर, भिम नगर, शताब्दी नगर.

**निळकंठ वि. जवादे**
मो. 9623773365
रमा नगर, मनीष नगर.

**विनोद कृष्णराव डूले**
वेदांगा न्यूजपेपर, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, .
मो. 7447767922

**आशिष थुल**
मो. 9423400956
धरमपेठ, आंबेडकरनगर

**राम मानवटकर**
मो. 8626037360,
न्यू. मनिष नगर

**अमन शरणागत**
मो.9575673895
टेकअप सिटी , दिघोरी, बहादूरा पेपर एजन्सी,

**राहुल आठवले**
मो.8485854398
संबोधी बुद्ध विहार, गिट्टीखदान, काटोल रोड, नागपूर

**दिगाबर पांडुरंग वासनिक**
मो.9561974131
454- नविन सुभेदार ले आऊट
दिनेश पेपर एजन्सी

**गौतम भीमराव मेश्राम**
जयवंत नगर , अभयनगर
मो. 9975941830

**स्वप्निल वाढबुधे**
न्यू अमर नगर, शेषनगर, विठ्ठल नगर, सिद्धेश्वरी नगर, चक्रपाणी नगर, गजानन नगर. मो. 96046 54382

**योगेश मेहर**
टेक ऑफ सिटी, बहादुरा परिसर
मो. 919552971648

**दिनेश टेंभुर्णे**
इंदोरा, लष्करी बाग, बेझनबाग, पी. डब्ल्यू ए
मो. 8806511702

**गजानन गायकवाड**
कार्तिक मार्टट्ठ , बेसा सेंटर, पेट्रोल पंप जवळ, बेसा
मो.9921552488

**राजेश नंदनवार**
राहुलनगर, सोमलवाडा
मो. 9850335018

**विनायक हाडके**
प्रतापनगर
मो.न.9545750757

**शैलेश माटे**
जयताळा, त्रिमूर्ती नगर, अंबाझरी मो. 9767987363

**संदिप टेंभुरकर**
समता नगर, नारा रोड नागपूर
मो. 8657565247

**विनोद जंगले**
हनुमान नगर, नागपूर
मो. 9545641801

21 August 2026 page 03-1_Layout 1 20-08-2026 04:54 PM Page 1



बहुजन मध्यमवर्गाच्या यशानंतर सुरू होणाऱ्या नव्या सामाजिक जबाबदारीचा प्रश्न

# आपण पोहोचलो; पण दरवाजा उघडा ठेवला का?

एका पिढीने शाळेच्या दारापर्यंत पोहोचण्यासाठी संघर्ष केला. दुसऱ्या पिढीने महाविद्यालय गाठले. तिसरी पिढी सरकारी कार्यालये, विद्यापीठे, बँका, न्यायव्यवस्था आणि उद्योगक्षेत्रात पोहोचली. आज त्याच प्रवासातून आलेली पुढची पिढी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या बोर्डरूममध्ये आहे, परदेशी विद्यापीठांत शिक्षण घेत आहे, तंत्रज्ञानाच्या नव्या क्षेत्रांत काम करत आहे, स्वतःची घरे आणि व्यवसाय उभे करत आहे, तसेच जगभर प्रवास करत आहे. हा बदल लहान नाही. भारतीय समाजाच्या हजारो वर्षांच्या सामाजिक रचनेच्या संदर्भात पाहिले, तर ही एका विलक्षण सामाजिक परिवर्तनाची फलश्रुती आहे.

परंतु प्रत्येक यशस्वी चळवळीसमोर एक दिवस असा प्रश्न उभा राहतो, ज्यांच्यासाठी संघर्ष केला, त्यांच्यापैकी काही जण व्यवस्थेत पोहोचल्यानंतर त्या संघर्षाचे पुढे काय होते? आज बहुजन समाजाने हा प्रश्न स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. शिक्षण, आरक्षण, शहरीकरण, रोजगार आणि घटनात्मक अधिकारांच्या माध्यमातून गेल्या काही दशकांत एक मोठा शिक्षित बहुजन मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. ही निर्मिती योगायोगाने झालेली नाही. तिच्यामागे महात्मा फुले यांचा शिक्षणासाठीचा संघर्ष आहे; सावित्रीबाई फुले यांच्या शाळेच्या पायऱ्या आहेत; राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक न्यायाचे प्रयोग आहेत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेली घटनात्मक वाट आहे. त्यामुळे आज बहुजन समाजातील एखादा तरुण मोठ्या कंपनीत वरिष्ठ पदावर पोहोचतो, डॉक्टर, वकील, प्राध्यापक किंवा प्रशासकीय अधिकारी होतो अथवा उद्योजक बनतो, तेव्हा ते केवळ एका व्यक्तीचे यश नसते. त्याच्या मागे अनेक पिढ्यांचा न दिसणारा संघर्ष आणि इतिहास उभा असतो. याचा अर्थ त्याच्या प्रत्येक वैयक्तिक यशावर समाजाने हक्क सांगावा, असा अजिबात नाही. ही बाब स्पष्टपणे सांगितली पाहिजे. बहुजन माणसाला सुखी होण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्याने चांगले घर घ्यावे, पैसा कमवावा, आपल्या मुलांना उत्तम शिक्षण द्यावे, जग पहावे, संपत्ती निर्माण करावी आणि आपल्या आधीच्या पिढ्यांना ज्या संधी नाकारल्या गेल्या, त्या सर्व संधींचा अनुभव घ्यावा. दारिद्र्याला रोमँटिक करणे ही सामाजिक न्यायाची भूमिका असू शकत नाही. परंतु वैयक्तिक प्रगती आणि सामाजिक विस्मरण या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. आपण पुढे गेलो, हे चळवळीचे यश आहे; पण पुढे गेल्यानंतर मागे पाहणेच बंद केले, तर तो कोणाचा पराभव आहे? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. आज पहिल्या किंवा दुसऱ्या पिढीतील शिक्षित बहुजन



मध्यमवर्ग एका विलक्षण सीमेवर उभा आहे. एका बाजूला त्याच्या मागच्या पिढ्यांच्या संघर्षाची स्मृती आहे आणि दुसऱ्या बाजूला पुढच्या पिढीच्या अमर्याद शक्यता आहेत. या दोन जगांना जोडण्याची जबाबदारी त्याच्यावर आली आहे. ही जबाबदारी केवळ मोर्चात जाण्यापुरती किंवा घोषणाबाजीपुरती मर्यादित नाही. आपल्या कार्यालयात निर्णय घेताना सामाजिक प्रतिनिधित्वाचा विचार करणे हीसुद्धा सामाजिक जबाबदारी आहे. एखाद्या ग्रामीण विद्यार्थ्याला मार्गदर्शन करणे हीसुद्धा चळवळ आहे. आपल्या क्षेत्रातील पहिल्या पिढीतील तरुणासाठी नेटवर्कचे दार उघडणे, त्याला पुस्तकांसाठी मदत करणे, शिष्यवृत्ती निर्माण करणे, कायद्याची माहिती पोहोचवणे, एखाद्या मुलीच्या उच्च शिक्षणामागे ठामपणे उभे राहणे, या सगळ्यांत सामाजिक परिवर्तनाची आधुनिक रूपे दडलेली आहेत. कारण प्रत्येक काळातील चळवळ रस्त्यावरच दिसेल असे नाही. कधी ती वर्गखोलीत असते, कधी न्यायालयात, कधी एखाद्या पुस्तकात, कधी कॉर्पोरेट बोर्डरूममध्ये आणि कधी एका अनुभवी व्यक्तीने पहिल्या पिढीतील तरुणाला केलेल्या एका फोनमध्येही असते.

आजच्या बहुजन मध्यमवर्गासमोर म्हणून प्रश्न केवळ त्याच्या यशाचा नाही; तर त्याच्याकडे निर्माण झालेल्या सामाजिक भांडवलाचा आहे. आपण पैसा कमावला, शिक्षण मिळवले, पदे मिळवली, संपर्क निर्माण केले, भाषा आत्मसात केल्या आणि संस्थांची कार्यपद्धती समजून घेतली. आता या सगळ्या सामाजिक भांडवलाचे आपण काय करणार?



नेहा गोडघाटे

कारण पहिल्या पिढीची लढाई होती, "मला आत येऊ द्या." पुढच्या पिढीची जबाबदारी कदाचित अशी आहे, "मी आत आलो आहे; आता माझ्यामागून येणाऱ्यांसाठी दरवाजा बंद होऊ देणार नाही." कदाचित आधुनिक बहुजन चळवळीचा पुढचा अध्याय याच एका वाक्यात दडलेला आहे. आपण पोहोचलो, ही अभिमानाची बाब आहे. पण आपल्या मागे येणाऱ्यांसाठी दरवाजा उघडा ठेवला, तरच त्या प्रवासाला खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप प्राप्त होईल.●●

## श्रद्धेचा आरसा

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

भूल और भगवान, मानो तो ही दिखते है " माणसाच्या आयुष्यात काही गोष्टी डोळ्यांना दिसत नाहीत, पण त्या मनाला नक्की जाणवतात. प्रेम, विश्वास, माया, आपुलकी आणि श्रद्धा यांचे अस्तित्वही असेच असते. त्याच रांगेत दोन गोष्टी उभ्या राहतात, भूल आणि भगवान. त्या दोन्हींचा शोध बाहेरच्या जगात लागत नाही; तो स्वतःच्या अंतर्मनात घ्यावा लागतो. आपण चुकतो, हे प्रत्येकाच्या आयुष्यात घडतेच. पण खरी अडचण चूक होण्यात नसते, तर ती स्वीकारण्यात असते. जो स्वतःची चूक मान्य करतो, तो आयुष्याच्या शाळेतला खरा विद्यार्थी ठरतो. कारण चूक मान्य करणारा माणूस पुन्हा उभा राहतो, अधिक शहाणा होतो आणि अनुभवाने समृद्ध होतो. पण ज्याला स्वतःची चूकच दिसत नाही, त्याच्यासाठी प्रत्येक वेळी दोष दुसऱ्याचाच असतो. भगवंताचेही तसेच आहे. श्रद्धा असेल तर देव दगडातही दिसतो; श्रद्धा नसेल तर देवळात उभे राहूनही तो सापडत नाही. देव म्हणजे केवळ मूर्ती नव्हे, तर चांगल्या विचारांची प्रेरणा, संकटात मिळणारा धीर, दुसऱ्याच्या दुःखात उमटणारी करुणा आणि सत्याच्या वाटेवर चालण्याचे बळ होय. ही अनुभूती ज्याच्या मनात जागी होते, त्यालाच भगवान भेटतो. म्हणून आयुष्यात दोन गोष्टी जपायला हव्यात. स्वतःच्या चुका ओळखण्याचे प्रामाणिकपण आणि परमेश्वरावरचा निखळ विश्वास. एक आपल्याला अहंकारापासून दूर नेते, तर दुसरी जीवनाला आशेचा प्रकाश देते. चूक मान्य करणारा माणूस मोठा होतो आणि श्रद्धा जपणारा माणूस समृद्ध होतो. शेवटी जीवनाचा सार एवढाच, मन स्वच्छ असेल, विचार निर्मळ असतील आणि विश्वास अढळ असेल, तर आपल्या प्रत्येक पावलावर चुकांतून शिकण्याची संधी आणि प्रत्येक श्वासात ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव आपोआप होत राहते.●●

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदान



भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास केवळ ब्रिटिशांविरुद्धच्या राजकीय आंदोलनापुरता मर्यादित नाही. तो सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा, प्रतिनिधित्व आणि लोकशाही हक्कांसाठी झालेल्या संघर्षाचाही इतिहास आहे. या व्यापक लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. इतर अनेक नेते भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लढत असताना, डॉ. बाबासाहेब स्वतंत्र भारतातील शेतकरी, कामगार, महिला आणि वंचित समाजाला सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळावे यासाठी पायाभरणी करत होते. डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्यपूर्व काळात दोन आघाड्यांवर संघर्ष केला, एकीकडे ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या आर्थिक व राजकीय धोरणांवर टीका केली आणि दुसरीकडे भारतीय समाजातील जातिव्यवस्था, अस्पृश्यता व सामाजिक विषमतेविरुद्ध लढा दिला. त्यांच्या मते राजकीय स्वातंत्र्याला सामाजिक लोकशाहीची जोड नसेल, तर स्वातंत्र्य अपूर्ण राहील. मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा आणि १९१९च्या साऊथबरो समितीसमोर डॉ. बाबासाहेबांनी वंचित समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न प्रभावीपणे मांडला. मतदानाचा अधिकार केवळ श्रीमंत, जमीनदार किंवा उच्चशिक्षितांपुरता मर्यादित न राहता सर्व प्रौढ नागरिकांना मिळावा, अशी त्यांची भूमिका होती. जातिव्यवस्थेमुळे सामान्य निवडणुकांमध्ये दलितांना योग्य प्रतिनिधित्व मिळणार नाही, म्हणून त्यांना स्वतंत्र राजकीय संरक्षण व स्वतंत्र मतदारसंघ मिळावेत, अशी त्यांनी मागणी केली. 'एक माणूस, एक मत' या लोकशाही तत्त्वाचा त्यांनी सातत्याने पुरस्कार केला. सायमन कमिशनच्या काळात काँग्रेससह अनेक भारतीय पक्षांनी 'सायमन गो बॅक' म्हणत बहिष्कार केला असताना डॉ. बाबासाहेबांनी वंचितांच्या हक्कांसाठी कमिशनसमोर साक्ष देण्याचा निर्णय घेतला. १९२८ मध्ये ते बॉम्बे प्रोव्हिन्शियल कमिटीचे सदस्य झाले. त्यांनी प्रौढ मतदानाचा अधिकार, अस्पृश्यांसाठी विधिमंडळात प्रतिनिधित्व, शिक्षणासाठी स्वतंत्र निधी आणि सरकारी प्रशासनात वंचितांना प्रतिनिधित्व यांसारख्या मागण्या मांडल्या. समितीच्या मतांशी मतभेद असल्यामुळे त्यांनी स्वतंत्र अहवाल सादर केला. त्यांच्या या भूमिकेमुळे वंचित समाजाच्या राजकीय हक्कांचा प्रश्न घटनात्मक चर्चेच्या केंद्रस्थानी आला. १९३० ते १९३२ दरम्यान झालेल्या तीन गोलमेज परिषदांमध्ये डॉ. बाबासाहेबांनी भारताच्या भावी राज्यव्यवस्थे बरोबरच अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची बाजू ठामपणे मांडली. पहिल्या गोलमेज परिषदेत त्यांनी भारताला स्वराज्य आणि जबाबदार सरकार मिळावे, अशी भूमिका घेतली. दुसऱ्या गोलमेज परिषदेत महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब यांच्यात दलितांच्या प्रतिनिधित्वाच्या प्रश्नावर तीव्र मतभेद झाले. गांधीजी अस्पृश्यांना हिंदू समाजाचा भाग मानत होते, तर डॉ. बाबासाहेबांचे म्हणणे होते की, सामाजिक वास्तव लक्षात घेता दलितांना स्वतंत्र राजकीय संरक्षण आवश्यक आहे. दुसऱ्या गोलमेज परिषदेनंतर ब्रिटिश प्रधानमंत्री रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी १६ ऑगस्ट १९३२ रोजी जातीय निवाडा जाहीर केला. त्यात अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची तरतूद करण्यात आली. त्याला विरोध म्हणून गांधीजींनी येरवडा कारागृहात आमरण उपोषण सुरू केले. देशातील परिस्थिती आणि गांधीजींचे प्राण वाचवण्याचा प्रश्न लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेबांनी तडजोड स्वीकारली. २४ सप्टेंबर १९३२ रोजी झालेल्या पुणे करारामुळे स्वतंत्र मतदारसंघाऐवजी संयुक्त मतदारसंघात दलितांसाठी राखीव जागांची संख्या वाढविण्यात आली. हा प्रसंग डॉ. बाबासाहेबांच्या राजकीय संघर्षातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला. डॉ. बाबासाहेबांचे योगदान केवळ राजकीय प्रतिनिधित्वापुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या The Evolution of Provincial Finance in British India या ग्रंथातून त्यांनी ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांचे सखोल विश्लेषण केले. भारतातील संपत्तीचे शोषण आणि आर्थिक केंद्रीकरण त्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले. २० जुलै १९२४ रोजी त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन करून शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि राजकीय जागृतीला संस्थात्मक स्वरूप दिले. १९२६ ते १९३६ या काळात मुंबई कायदे मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी कामगार, गरीब आणि वंचित घटकांच्या प्रश्नांना आवाज दिला. पुढे कामगार व ऊर्जा मंत्री म्हणून त्यांनी जलसंपदा, सिंचन, वीज आणि औद्योगिक विकासाच्या दीर्घकालीन नियोजनावर भर दिला. दामोदर खोरे आणि हिराकूंडसारख्या बहुउद्देशीय प्रकल्पांच्या नियोजनात त्यांचे योगदान होते. केंद्रीय जलमार्ग, सिंचन व नौकानयन आयोग तसेच विद्युत विकासाच्या संस्थात्मक चौकटीसाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे साधन मानून त्यांनी १९४५ मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. सिद्धार्थ कॉलेज आणि मिलिंद कॉलेजसारख्या संस्थांच्या माध्यमातून वंचित समाजासाठी उच्च शिक्षणाची दारे खुली केली.



प्रा. संध्या वैद्य
मो. 9029219634

भारत स्वतंत्र झाल्यानंतर संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेबांनी स्वातंत्र्यलढ्याच्या सामाजिक व वैचारिक उद्दिष्टांना घटनात्मक रूप दिले. समानता, स्वातंत्र्य, शोषणाविरुद्ध संरक्षण, धार्मिक स्वातंत्र्य आणि घटनात्मक उपायांचा अधिकार यांना संविधानात स्थान मिळाले. डॉ. बाबासाहेबांची स्वातंत्र्याची संकल्पना व्यापक होती. त्यांच्या मते केवळ ब्रिटिश सत्ता संपणे म्हणजे स्वातंत्र्य नव्हे; जातिभेद, अस्पृश्यता, विषमता आणि शोषण संपवून प्रत्येक नागरिकाला समान प्रतिष्ठा मिळणे आवश्यक आहे. म्हणूनच त्यांचा संघर्ष हा केवळ एका समाजासाठी नव्हता, तर आधुनिक, लोकशाहीवादी, समतावादी आणि न्यायाधिष्ठित भारताच्या निर्मितीसाठी होता.●●




शिशिर ऋतूनंतर येणारा वसंत ऋतू हा निसर्गातील नवचैतन्याचा काळ आहे. मात्र याच काळात शरीरात साचलेला कफ वितळून त्याचा प्रकोप होऊ शकतो. त्यामुळे सर्दी, खोकला, कफ, ॲलर्जी, आळस, भूक मंदावणे यांसारख्या तक्रारी काही व्यक्तींमध्ये वाढताना दिसतात. आयुर्वेदानुसार चैत्र आणि वैशाख हे वसंत ऋतूचे महिने मानले जातात. साधारणपणे मार्च महिन्याचे शेवटचे 2 आठवडे एप्रिल महिना व मे महिन्याचे सुरवातीचे 15 दिवस असा हा 60 दिवसांच्या कालावधीत वसंत ऋतूचा अनुभव येतो. या काळात हिवाळ्याची तीव्रता कमी होते आणि सूर्याची उष्णता वाढू लागते. शिशिर ऋतूमध्ये शरीरात कफाचा संचय झालेला असतो. वसंत ऋतूमध्ये वाढत्या उष्णतेमुळे हा कफ वितळतो आणि प्रकुपित होतो. त्यामुळे कफाशी संबंधित लक्षणे दिसू शकतात. वसंत ऋतूमध्ये कफ का वाढतो?

**आयुर्वेदात** "**कफः** शैत्येन चीयते" या तत्त्वानुसार थंडीच्या काळात कफाचा संचय होतो. त्यानंतर वसंतातील उष्णतेमुळे तो वितळतो. कफाची प्रमुख लक्षणे म्हणजे स्थैर्य, गुरुता, शीतलता, स्निग्धता आणि मंदता. त्यामुळे वसंत ऋतूमध्ये शरीरात जडपणा, आळस, झोप येणे, भूक मंदावणे, कफ वाढणे, नाक बंद होणे, शिंका येणे, खोकला, घशात कफ साचणे यांसारख्या तक्रारी जाणवू शकतात.

**वसंत ऋतुचर्येचे महत्त्व :** ऋतूनुसार आहार आणि जीवनशैली बदलणे म्हणजेच ऋतुचर्या. योग्य ऋतुचर्येमुळे शरीराला बदलत्या वातावरणाशी जुळवून घेण्यास मदत होते. वसंत ऋतूमध्ये कफ कमी करण्यासाठी आहार हलका, उष्ण आणि सहज पचणारा असावा. नियमित व्यायाम आणि सक्रिय जीवनशैलीलाही महत्त्व आहे. या ऋतूमध्ये कफहर आणि लघु आहार घेण्याचा सल्ला आयुर्वेद देतो. यासाठी आहारात मूगडाळ, जव, जुने धान्य, हिरव्या पालेभाज्या तसेच या ऋतुत येणाऱ्या विविध भाज्या, मसूर व मूग यांसारखी हलकी कडधान्ये यांचा आहारात समावेश करावा. सुंठ, जिरे, मिरी यांसारखे मसाले योग्य प्रमाणात वापरावे. आयुर्वेदानुसार कोमट पाणी व मध यांच्या सेवनामुळे कफ कमी होतो. म्हणून या ऋतूमध्ये यांचा वापर करावा वसंत ऋतूमध्ये कफ वाढविणारे पदार्थ कमी करणे हितावह मानले जाते. यासाठी अतिगोड पदार्थ, अतिस्निग्ध पदार्थ, तळलेले पदार्थ, जंक फूड, आईस्क्रीम व अतिथंड पदार्थ, जास्त दूध व दुग्धजन्य पदार्थ, अतिप्रमाणात मिठाई, दिवसा जड भोजन, अति खाणे टाळून भूक आणि पचनशक्तीनुसार आहार घ्यावा. वसंत ऋतूमध्ये शरीरातील कफ कमी करण्यासाठी व्यायाम अत्यंत उपयुक्त मानला जातो. यासाठी व्यक्तीच्या वय, प्रकृती आणि क्षमतेनुसार जलद चालणे, सूर्यनमस्कार, योगासने, प्राणायाम, सायकलिंग, पोहणे, हलका ते मध्यम व्यायाम करावा. अतिव्यायाम टाळावा. वसंत ऋतूमध्ये उद्वर्तन म्हणजे औषधी चूर्णाने शरीरावर घर्षण करणे, ही कफ कमी करण्याच्या दृष्टीने उपयुक्त आयुर्वेदिक पद्धत मानली जाते. अभ्यंगदेखील आयुर्वेदातील महत्त्वाची दिनचर्या आहे. मात्र कोणते तेल, किती वेळ आणि किती प्रमाणात वापरावे हे व्यक्तीची प्रकृती व स्थिती पाहून ठरवणे योग्य आहे. वसंत ऋतूमध्ये दिवसा झोपल्याने कफ आणि जडपणा वाढण्याची शक्यता आयुर्वेदात **सांगितली आहे. त्यामुळे सामान्यतः** दिवसा झोपणे टाळावे. मात्र लहान मुले, वृद्ध व्यक्ती, आजारी व्यक्ती किंवा विशेष परिस्थितीतील व्यक्तींना याबाबत तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

आयुर्वेदामध्ये वसंत ऋतू हा वमन कर्मासाठी अनुकूल काळ मानला जातो. मात्र पंचकर्म ही साधी घरगुती उपचारपद्धती नाही. वमन किंवा इतर पंचकर्म स्वतःहून करू नये. प्रशिक्षित आयुर्वेद तज्ज्ञांकडून प्रकृती, वय, अग्नी, रोगावस्था आणि इतर घटकांचे परीक्षण करूनच उपचार करावेत. वसंत ऋतूमध्ये वातावरणातील परागकण, धूळ आणि हवामानातील बदल यामुळे काही व्यक्तींना शिंका, नाक वाहणे, घशात खवखव किंवा खोकला यांसारख्या तक्रारी होऊ शकतात. अशा वेळी धूळ व धूर टाळणे पुरेसे पाणी पिणे, हातांची स्वच्छता राखणे, घरातील धूळ नियमित साफ करणे, पुरेशी झोप घेणे याकडे लक्ष द्यावे. ताप, श्वास घेण्यास त्रास, छातीत दुखणे, सतत खोकला किंवा गंभीर लक्षणे असल्यास वैद्यकीय तपासणी आवश्यक आहे. आजच्या काळात ऋतुचर्येचा अर्थ केवळ पारंपरिक नियम पाळणे एवढाच नसून ऋतूनुसार संतुलित जीवनशैली स्वीकारणे असा आहे. वसंत ऋतूमध्ये सकाळी लवकर उठणे, कोमट पाणी पिणे, नियमित व्यायाम, संतुलित नाश्ता, हलका व पौष्टिक आहार, दिवसभर सक्रिय राहणे, रात्री वेळेवर झोपणे ही साधी दिनचर्या पालन केल्यास आपण निरोगी व स्वस्थ जीवन जगू शकतो. "ऋतुबदलाला शरीराची योग्य साथ मिळाली तर आरोग्य अधिक चांगले राहू शकते." वसंत ऋतू हा निसर्गातील नवचैतन्याचा काळ असला तरी शरीरातील कफाच्या बदलांचा काळही आहे. त्यामुळे आहारात संयम, नियमित व्यायाम, योग्य दिनचर्या आणि पुरेशी विश्रांती यांचा समतोल राखणे महत्त्वाचे आहे. स्वस्थ रहा मस्त रहा!●●

आरोग्यम् सुखसंपदा



डॉ. सूर्यकांता पाटील
मो. 9923338047



# बौद्ध जीवन मार्ग
# स्वचा स्वामी स्व!

स्वला स्वत्व असेल तर स्व ने स्वत्वावर विजय संपादन करण्याचे प्रयास करावे हा बौद्ध जीवन मार्ग आहे. स्वचा स्वामी स्वशिवाय आणखी कोण असू शकतो? स्वसंयत असेल स्व नियंत्रित असेल तर स्वला दुर्लभ स्वामित्वाची उपलब्धी होते. जो मुर्ख माणूस अर्हताच्या आर्यांच्या शीलवानांच्या शासनाची उपेक्षा करतो आणि मिथ्या सिद्धांताचा स्वीकार करतो, मिथ्या आचरण करतो, तेव्हा ज्याप्रमाणे कथ्थक बोरुची फळे त्याच्याच विनाशाला कारण ठरतात. त्याचप्रमाणे त्याच्या कर्माची फळे त्याच्या विनाशाला कारक ठरतात. जो पापकर्म करतो त्यालाच त्या कर्माची फळे भोगावी लागतात. जो पापकर्म करीत नाही, पापकर्मापासून विरत असतो, तो स्वतःच शुद्ध होतो, पवित्र होतो. माणूस स्वतःलाच पवित्र करतो किंवा अपवित्र करतो. कोणीही दुसऱ्याला पवित्र करु शकत नाही किंवा अपवित्र करु शकत नाही, ही स्वतःवरच अवलंबून आहे. जो सुखोपभोगासाठी हपापलेला आहे, त्याची इंद्रिये अनियंत्रित असतात. तो भोजनात असंयमी असतो, तो आळशी असतो, तो हीन वीर्य असतो. वादळवारे ज्याप्रमाणे दुर्बल वृक्षाचा विनाश करतात त्याचप्रमाणे हा माणूस आपल्याच असंयमी कर्माने विनाश पावतो, जो सुखोपभोगाचा आसक्त नाही, त्याची इंद्रिये संयम असतात. अन्न ग्रहण करताना तो संयत असतो, जो श्रद्धावान आहे, वीर्यवान आहे, असा माणूस ज्याप्रमानणे वादळवारे पर्वताला विचलित करू शकत नाहीत. त्याप्रमाणे पतन पावत नाही जर माणसाला आपले स्व आणि स्वत्व प्रिय असेल तर माणसाने स्वत्वावर दक्षतेने लक्ष ठेवावे. सर्वप्रथम स्वतःला धम्ममार्गावर स्थापित करावे. नंतर दुसऱ्याला उपदेश द्यावा. सुज्ञ माणसाने दुसरे त्याच्यावर लांछन लावतील असा प्रसंग स्वतःवर आणू नये, असा अवसर देऊ नये, असे आचरण करू नये, असे म्हणतात की स्वनियंत्रण कठीण आहे. दुसऱ्याला उपदेश देणारा, स्वतःवर त्याचप्रमाणे नियंत्रण ठेवीत असेल तर असा स्वतःवर योग्य नियंत्रण राखणारा इतरांनाही योग्यप्रकारे नियंत्रित करू शकतो. स्वतः केलेल्या पापकर्माची फळे स्वतःलाच भोगावी लागतात. माणूस स्वतःच स्वतःला शुद्ध करू शकतो. पवित्रता आणि अपवित्रता या स्वगत आहे. दुसरा कोणीही दुसऱ्याला पवित्र करू शकत नाही. एखादा शूरवीर युद्धात हजारो हजार माणसांवर विजय मिळवित असेल पण ज्याने स्वतःवर विजय मिळविला तो परमवीर होय. प्रथम स्वतःला धम्ममार्गावर प्रस्थापित करावे. नंतर दुसऱ्याला उपदेश द्यावा, सुज्ञ माणसाने इतरांना त्याच्यावर लांछन लावण्याची संधी देऊ नये. जर कोणी दुसऱ्याला उपदेश देतो, तसेच आचरण करीत असेल तर असा योग्य प्रकारे स्वनियंत्रित माणूस दुसऱ्यांनाही नियंत्रित करू शकतो. असे म्हणतात की, स्वनियंत्रण महाकठीण आहे. स्व हाच स्व चा संरक्षक आहे. स्वचा संरक्षक दुसरा कोण असू शकतो? जो स्वतःचे संरक्षण करू शकतो, त्याला स्वतःसारखा संरक्षक मिळणे दुर्लभ आहे. जर स्व स्वतःला प्रिय असेल तर स्ववर समाधान चित्ताने लक्ष ठेवावे स्वतःच्या पापाची फळे स्वतःलाच भोगावी लागतात. स्वच स्वतःची शुद्धी करतो, पवित्रता आणि अपवित्रता या स्वगत आहेत. दुसरा दुसऱ्याला पवित्र करू शकत नाही. स्वच स्वचा संरक्षक आहे. स्वचा स्व शिवाय कोण संरक्षक होऊ शकतो. स्वतःचे संरक्षण व्हावे, स्वचे संरक्षक स्वतः केले तर स्वतःसारखा संरक्षक मिळणे दुर्लभ आहे.●●

शारदा पाटील मोटघरे
मो. 8010763645

# चीनमध्ये बुद्ध धम्माचा प्रवेश
## एका स्वप्नापासून ज्ञानाच्या महामार्गापर्यंत

भारतभूमीत तथागत गौतम बुद्धांनी मानवाच्या दुःखाकडे करुणेने पाहून दुःखमुक्तीचा मार्ग सांगितला. प्रज्ञा, करुणा, नैतिकता, अहिंसा आणि विवेकावर आधारलेला बुद्धांचा धम्म भारताच्या सीमांमध्ये बंदिस्त राहिला नाही. भारतातून तो श्रीलंका, मध्य आशिया, चीन, कोरिया, जपान आणि आग्नेय आशियातील अनेक प्रदेशांत पोहोचला. या प्रवासात चीनचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. चीनमध्ये पोहोचलेला बुद्धविचार पुढे पूर्व आशियातील बौद्ध संस्कृतीचा महत्त्वाचा आधार बनला. चीनमध्ये बुद्ध धम्म पोहोचला, तेव्हा तेथील समाज कन्फ्यूशियन आणि ताओ परंपरांनी प्रभावित होता. कन्फ्यूशियन विचारात कुटुंब, सामाजिक शिस्त, कर्तव्य आणि नैतिक आचरणाला महत्त्व होते. ताओ विचारात निसर्गाशी सुसंवाद, साधेपणा आणि जीवनाकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्यावर भर होता. अशा वातावरणात भारतातून आलेला बुद्ध धम्म सुरुवातीला परदेशी विचार वाटत होता. भाषा, संस्कृती आणि धार्मिक संकल्पना वेगळ्या असल्याने त्याचा स्वीकार सहज झाला नाही. मात्र पुढे बुद्ध धम्माने चीनच्या संस्कृतीत महत्त्वाचे स्थान मिळवले. चीनमध्ये बुद्ध धम्माच्या प्रवेशाबाबत सम्राट मिंगदीशी संबंधित एक प्रसिद्ध लोककथा सांगितली जाते. इ.स. ६४ च्या आसपास सम्राटाला एका रात्री विलक्षण स्वप्न पडले. स्वप्नात त्याने तेजस्वी, सुवर्णवर्णाचा एक पुरुष पाहिला. त्याच्या मस्तकाभोवती प्रकाश होता आणि त्या प्रकाशाने राजवाडा उजळून निघाला. सकाळी सम्राटाने दरबारातील विद्वानांना स्वप्नाचा अर्थ विचारला. पश्चिमेकडे 'बुद्ध' नावाचा एक महान ज्ञानी पुरुष झाला असून स्वप्नातील तेजस्वी व्यक्ती बुद्ध असावी, असे त्याला सांगण्यात आले. त्यानंतर सम्राटाने पश्चिमेकडे दूत पाठवून या महान विचाराचा शोध घेण्याचा निर्णय घेतला, अशी परंपरा आहे. या कथेत तपशीलांचे वेगवेगळे प्रकार आढळतात; मात्र तिचा मुख्य आशय समान आहे. चीनच्या सम्राटाला पश्चिमेकडून येणाऱ्या एका महान विचाराची चाहूल लागली आणि त्या विचाराचा शोध घेण्यासाठी चीनने भारताच्या दिशेने पाहिले. ही कथा बौद्ध परंपरेत प्रतीकात्मक महत्त्वाची आहे. मात्र चीनमध्ये बुद्ध धम्माचा प्रवेश केवळ या स्वप्नामुळे झाला, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. इतिहासानुसार इ.स. पहिल्या शतकापासून भारत, मध्य आशिया आणि चीन यांच्यातील व्यापारमार्गांद्वारे बौद्ध विचार चीनमध्ये पोहोचत होता. रेशीम मार्ग हा केवळ व्यापाराचा मार्ग नव्हता. व्यापाऱ्यांसोबत भिक्षू, प्रवासी,



ग्रंथ, भाषा आणि संस्कृतीही प्रवास करत होत्या. भारत, गांधार, मध्य आशिया, खोतान, कुचा आणि चीन या प्रदेशांतून बुद्ध धम्माचा प्रसार झाला. त्यामुळे त्याचा प्रवास एका सरळ मार्गाने झालेला नव्हता; विविध प्रदेशांच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने तो चीनमध्ये रुजत गेला. सम्राट मिंगच्या परंपरेनुसार पश्चिमेकडे गेलेल्या दूतांना काश्यप मातंग आणि धर्मरत्न हे दोन बौद्ध भिक्षू भेटले. ते चीनमध्ये आले आणि लुओयांग येथे बौद्ध ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर करण्यास त्यांनी सुरुवात केली, अशी परंपरा आहे. इ.स. ६७-६८ च्या आसपास त्यांचे चीनमध्ये आगमन झाल्याचे सांगितले जाते. लुओयांगमधील बाईमा सी म्हणजेच व्हाइट हॉर्स टेंपल हे या इतिहासाशी जोडलेले प्रसिद्ध ठिकाण आहे. भारतातून आणलेले ग्रंथ पांढऱ्या घोड्यावरून चीनमध्ये आले, म्हणून या मंदिराला हे नाव मिळाले, अशी परंपरा आहे. बुद्ध धम्माचा प्रसार करण्यासाठी भाषांतराचे काम अत्यंत महत्त्वाचे ठरले. भारतातील बौद्ध ग्रंथ संस्कृत आणि इतर भारतीय भाषांमध्ये होते, तर चीनची भाषा वेगळी होती. त्यामुळे बुद्ध, धम्म, संघ, निर्वाण, बोधिसत्त्व, प्रज्ञा आणि करुणा यांसारख्या संकल्पना चिनी समाजाला समजावून सांगण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भाषांतर झाले. भारताबरोबरच मध्य आशियातूनही अनेक भिक्षू चीनमध्ये आले. या प्रक्रियेत कुमारजीव यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. मध्य आशियातील कुचा प्रदेशातून चीनमध्ये आलेल्या कुमारजीवांनी अनेक बौद्ध ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर केले. त्यांच्या कार्यामुळे महायान बुद्ध धम्मातील अनेक महत्त्वाचे विचार चीनमध्ये प्रभावीपणे पोहोचले. भारतीय बौद्ध तत्त्वज्ञान चिनी समाजाला समजेल अशा भाषेत मांडण्याचे त्यांचे योगदान ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरले. इ.स. चौथ्या ते आठव्या शतकात चीनमध्ये बुद्ध धम्माचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला. बौद्ध मठांची संख्या वाढली, ग्रंथांचे भाषांतर झाले, तत्त्वज्ञानाचा अभ्यास वाढला आणि बुद्धमूर्ती तसेच बौद्ध गुफांची निर्मिती झाली. लियांग, सुई आणि तांग राजवंशांच्या काळात बुद्ध धम्माला मोठा राजाश्रय मिळाला. लियांग राजवंशाचा सम्राट वू हा बुद्ध धम्माचा प्रमुख आश्रयदाता होता. त्याच्या काळात बौद्ध संघ आणि मठांना मोठ्या प्रमाणावर मदत मिळाली. चीनमधील बौद्ध कलेचे वैभव पाहायचे असेल तर लोंगमेन गुफा महत्त्वाच्या आहेत. येथे हजारो बौद्ध प्रतिमा आणि गुफा आहेत. तांग काळातील विशाल वैरोचन बुद्धमूर्ती विशेष प्रसिद्ध आहे. तिची उंची १७.१४ मीटर, म्हणजे सुमारे ५६ फूट आहे. त्यामुळे बुद्ध धम्माचा प्रभाव धार्मिक क्षेत्राबरोबरच कला, शिल्पकला आणि स्थापत्य क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. चीनमध्ये बुद्ध धम्माचा विस्तार होत असताना चीनमधील भिक्षू भारताच्या दिशेने प्रवास करू लागले. फाहियान, ह्युएन त्सांग आणि इत्सिंग ही तीन नावे विशेष उल्लेखनीय आहेत. त्यांनी भारतात येऊन बौद्ध मठ, शिक्षणकेंद्रे, ग्रंथ आणि समाजजीवनाचा अभ्यास केला. फाहियान यांनी इ.स. ३९९ च्या सुमारास भारताच्या दिशेने प्रवास सुरू केला. सातव्या शतकातील ह्युएन त्सांग यांनी नालंदा महाविहारात अध्ययन केले आणि भारतातील बौद्ध शिक्षणव्यवस्थेचा जवळून अभ्यास केला. इत्सिंग यांनी भारतासोबत आग्नेय आशियातील बौद्ध केंद्रांनाही भेट दिली. या तिन्ही चिनी यात्रेकरूंचे लेखन आज भारताच्या प्राचीन इतिहासासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. नालंदा, बोधगया, राजगृह, कुशीनगर यांसारख्या बौद्ध स्थळांविषयीची माहिती त्यांच्या प्रवास वर्णनातून मिळते. भारतातील बौद्ध इतिहासाच्या अभ्यासासाठी त्यांच्या नोंदी महत्त्वाचा आधार ठरतात. भारत आणि चीनमधील हा संबंध केवळ धर्मापुरता मर्यादित राहिला नाही. त्यातून कला, वास्तुकला, शिल्पकला, भाषा, साहित्य आणि शिक्षण यांची देवाणघेवाण झाली. चीनमध्ये विकसित झालेल्या बौद्ध परंपरांचा प्रभाव पुढे कोरिया आणि जपानवरही पडला. चीनमधील चॅन परंपरा पुढे जपानमध्ये 'झेन' या नावाने प्रसिद्ध झाली.म्हणून चीनमध्ये बुद्ध धम्माचा प्रवेश ही एका दिवसाची घटना नव्हती. सम्राट मिंगच्या स्वप्नाची कथा त्याची सुंदर प्रतिकात्मक सुरुवात सांगते; परंतु त्यामागे व्यापारी, भिक्षू, प्रवासी, भाषांतरकार, राजे आणि सामान्य लोकांचा मोठा सहभाग होता. रेशीम मार्गाने वस्तूंबरोबर विचारांचीही देवाणघेवाण केली.



पद्मा बहादुरे
मो. 9405984428

सुरुवातीला चीनला बुद्ध धम्म परदेशी वाटला; पण पुढे तो चीनच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला. भारतात जन्मलेला बुद्धांचा विचार चीनने स्वीकारला, चिनी भाषेत व्यक्त केला आणि आपल्या संस्कृतीत रुजवला. भारतातून निघालेला बुद्धांचा ज्ञानप्रकाश चीनपर्यंत पोहोचला आणि तेथून पूर्व आशियातील अनेक देशांमध्ये पसरला. त्यामुळे चीनमधील बुद्ध धम्माचा इतिहास हा केवळ धर्मप्रसाराचा इतिहास नसून भारत आणि चीन यांच्यातील ज्ञान, संस्कृती आणि विचारांच्या दीर्घ देवाणघेवाणीचा इतिहास आहे. बुद्ध धम्माचा हा प्रवास आपल्याला सांगतो की, दुःखाला उत्तर देणारा, करुणा, प्रज्ञा आणि नैतिकतेचा संदेश देणारा विचार कोणत्याही एका देशाच्या सीमेत अडकून राहत नाही. तो सीमा ओलांडतो, संस्कृतींना जोडतो आणि मानवतेसाठी ज्ञानाचा महामार्ग निर्माण करतो.●●

## महत्वाचे

### "स्वातंत्र्याच्या कविता" कविसंमेलन

**नागपूर :** काव्यप्रेमी शिक्षक मंच नागपूर जिल्हा आयोजित स्वातंत्र दिनानिमित्त 'स्वातंत्र्याच्या कविता' हे ऑनलाईन कविसंमेलन झाले. या कविसंमेलनाचे अध्यक्ष कृष्णा शिंदे, स्वागत अध्यक्ष आनंद घोडके, तर उद्घाटक म्हणून दीपक सपकाळ लाभले होते. प्रमुख पाहुणे म्हणून खुशाल गुल्हाने आणि नीरज आत्राम लाभले होते. या सुंदर सोहळ्याचे सुंदर संचालन रेखा सोनारे यांनी केले. प्रास्ताविक निशा खापरे यांनी केले. स्वागत गीत अपर्णा कल्लावार यांनी म्हटले तर नागपूर जिल्हा समूहाने केलेल्या कार्याचा आढावा अर्चना कोहळे हिने सांगितला. पाहुण्यांचा परिचय डॉ. शील बागडे यांनी दिला आणि आभार प्रदर्शन सुचिता कुनघटकर यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन नागपूर जिल्हा अध्यक्ष निशा खापरे यांनी केले, संयोजकाची धुरा रेखा सोनारे यांनी सांभाळली. डॉ. नंदिनी खाडे, साधना कपाळे, डॉ. शिल बागडे, मेघा भांडारकर, मनीषा ब्राह्मणकर, हरिदास गौतम, साहेबराव तायडे, कीर्ती लंगडे, मुकेश वानखेडे, माया बागडे, शोभा वागळे, प्रतिभा गडेकर, राजेश चौधरी, स्वाती सेलोकार, शालिनी कावरे, माधुरी सोनारे, अर्चना इंगोले, सुचिता पाटील या सहभागी कवी, कवयित्रिने देशभक्ती पर सुंदर कविता सादर केल्या.

### ज्येष्ठ सायकल स्नेही प्रा. विलास पारखी पर्यावरण मित्र पुरस्काराने सन्मानित



**गडचिरोली :** गेल्या नऊ वर्षांपासून सायकल चालवा, आरोग्यवान व्हा, प्रदूषण टाळा हे विशेष अभियान राबविण्यात यशस्वी झालेल्या सायकल स्नेही मंडळाचे जिल्हाध्यक्ष प्रा. विलास पारखी यांना पर्यावरणतज्ज्ञ दिवंगत विजय मार्कंडेवार स्मृती पर्यावरण मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. वसंत विद्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सायकल स्नेही मंडळाचे संस्थापक ग्राम. बंडोपंत बोढेकर होते, तर ज्येष्ठ पत्रकार अनिल धामोडे, सायकल स्नेही मंडळाचे सरचिटणीस उदय धकाते, वसंत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कामडी यांची उपस्थिती होती. सदर पुरस्कार राष्ट्रसंत विचार साहित्य परिषदेच्या वतीने दरवर्षी देण्यात येतो. पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड, सायकल स्नेही तसेच सर्पमित्र म्हणून करून निसर्ग संवर्धनाचे काम उत्स्फूर्तपणे करणारे प्रा. पारखी हे समर्पित व्यक्तीमत्व आहे, अशी भावना यावेळी बंडोपंत बोढेकर यांनी व्यक्त केली. संचालन मिरा बिसेन यांनी केले तर आभार प्रदर्शन उदय धकाते यांनी मानले. मुरलीधर दोनाडकर, प्रा. अरुण पालारपवार, डॉ. चंद्रकांत लेनगुरे, प्रा. उल्हास आखाडे, उपेंद्र द्रोहणकर, डॉ. योगेश पाटील, प्रा. संतोष संगनवार, प्रा. ज्ञानेश्वर धकाते, माधुरी बागडे-बोरकर, विनायक साळवे, वैभव बारेकर, डॉ. शुभम मोंढे, प्रा. सुनिता विजय साळवे, भाविक ठक्कर, संजय आकरे, राजेंद्र गव्हारे, पंकज भोगेवार आदींनी प्रा. पारखी यांचे अभिनंदन केले.




## संविधानिक मूल्यांचे पालन करणे नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य : डॉ. संजय शेंडे

**नागपूर :** दि. शेड्युल कास्ट अँड बुद्धिस्ट पेन्शनर्स असोसिएशन, २२१-ए बजाजनगर, नागपूरच्या करुणा सांस्कृतिक सभागृहात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा केला. संस्थासंचालित करुणा कॉन्व्हेंटमध्ये ध्वजारोहण करून विद्यार्थ्यांच्या विविध कार्यक्रमानंतर मिठाई वाटप करण्यात आली.

मुख्य कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. संस्थेला देणगी देणाऱ्या दानदात्यांचा सत्कार केला. प्रमुख प्रबोधनकार डॉ. संजय शेंडे (संशोधक, लेखक व समीक्षक) यांनी 'संविधानिक मूल्य आणि नागरिकांची जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन केले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व धर्मनिरपेक्षता या संविधानिक मूल्यांचे पालन करणे प्रत्येक नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. गुणवत्तापूर्ण शिक्षण, मागासवर्गीयांना समान रोजगाराच्या संधी आणि रिक्त शासकीय पदांची तत्काळ भरती करण्याची मागणीही त्यांनी केली. प्रास्ताविक वासुदेव फुसाटे, संचालन निवृत्ती मेश्राम, तर पाहुण्यांचा परिचय धर्मेश फुसाटे यांनी करून दिला. पालकुमार कांबळे यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. विकास जांभुळकर, डॉ. ओमप्रकाश चिमणकर, भी.म. कौसल (माजी माहिती व जनसंपर्क संचालक) दिगांबर गोंडाणे, ज्येष्ठ उद्योजक प्रदीप नगराळे, डॉ. हितेश नगराळे, डॉ. सुशिल मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे सभासद परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केंद्र सरकारने पुन्हा केली ओबीसींची फसगत
## डॉ. ॲड. अंजली साळवे



**नागपूर :** केंद्र सरकारने २०२७ च्या जनगणना कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रश्नावलीतही ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम अंतर्भूत न केल्याने, भाजपप्रणीत केंद्र सरकारने पुन्हा एकदा ओबीसींची फसवणूक केली आहे. प्रश्नावलीत स्वतंत्रपणे 'ओबीसीं' असा स्पष्ट कॉलम टाळून निव्वळ 'जात' असा ओपन-एंडेड उल्लेख करून मोठा संभ्रम निर्माण केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस डॉ. ॲड. अंजली साळवे यांनी केला आहे. कोरोनामुळे २०२१ ची जनगणना २०२७ पर्यंत पुढे कलण्यात आली आहे. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात ओबीसींचा स्वतंत्र उल्लेख टाळल्यामुळे ओबीसींच्या संविधानिक अधिकारांचे थेट हनन होत असल्याचे डॉ. साळवे यांनी म्हटले आहे. ओबीसी जनगणनेच्या मागणीचा विषय वारंवार आंदोलन करून व यापूर्वी खासदारांच्या माध्यमातून संसदेत मांडण्यात आला होता. परंतु जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात ओबीसींना वगळण्यात आले. त्यानंतर आंदोलन तीव्र झालीत आणि दुसऱ्या टप्प्यात ओबीसींची गणना केली जाईल, असे आश्वासन केंद्राद्वारे देण्यात आले होते. मात्र, १४ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेतील प्रश्नावलीतील क्रमांक १० च्या प्रश्नात ओबीसींचा स्पष्ट उल्लेख वगळून अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि 'जात' असा उल्लेख आहे. जात ही सर्वच प्रवर्गात आणि खुल्या वर्गांत असल्याने अशा 'ओपन-एंडेड' प्रश्नांमुळे कोट्यवधी लोकांच्या जाती-उपजतीच्या नावांमध्ये चुका होऊन डेटा अनाकलनीय होईल आणि ओबीसीचा आकडा मिळणार नाही आणि शेवटी 'डेटाचे विश्लेषण सुरू आहे' असे म्हणत २०२९ च्या निवडणुकीपर्यंत हा सावळागोंधळ सुरू ठेवण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोप त्यांनी केला. संविधानाच्या कलम ३४० नुसार मागासवर्गीयांची वस्तुनिष्ठ माहिती समोर येणे गरजेचे असताना, ओबीसींची नेमकी लोकसंख्या लपवून धोरणात्मक नियोजन कोणत्या आधारावर केले जात आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. केंद्र सरकारने जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र कॉलम समाविष्ट करून स्वतंत्र गणना करावी, अन्यथा देशव्यापी तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा डॉ. ॲड. अंजली साळवे यांनी दिला.

## 'वनार्टी'चे धनगर विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण

**नागपूर :** महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास व बहुजन कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) द्वारे धनगर प्रवर्गातील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षणाचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय व लष्करी सेवेत प्रवेश करू इच्छिणाऱ्या धनगर प्रवर्गातील विद्यार्थी या उपक्रमाद्वारे योग्य दिशा आणि दर्जेदार मार्गदर्शन मिळण्यास मदत होणार आहे, अशी माहिती 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी दिली. या सर्वसमावेशक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत केंद्रीय लोकसेवा आयोगाची (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षा, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) राज्यसेवा व इतर स्पर्धा परीक्षा, तसेच भारतीय लष्करातील विविध पदांसाठी होणाऱ्या सैनिक भरती परीक्षांच्या पूर्वतयारीचे सखोल धडे दिले जाणार आहेत. स्पर्धा परीक्षांमधील वाढती स्पर्धा लक्षात घेता, धनगर प्रवर्गातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना शासकीय सेवेच्या मुख्य प्रवाहात आणणे हा या प्रशिक्षण योजनेचा प्रमुख उद्देश आहे. प्रशिक्षणासाठी अर्ज प्रक्रिया १० ऑगस्ट २०२६ पासून सुरू झाली असून ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २३ ऑगस्ट २०२६ ठेवण्यात आली आहे. धनगर प्रवर्गातील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांनी 'वनार्टी'च्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाचा लाभ घेत शासकीय सेवेत प्रवेशाचे ध्येय साध्य करावे, असे आवाहन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तथा 'वनार्टी'चे अध्यक्ष अतुल सावे यांनी केले.



## अनुसूचित समाजाच्या 'भाजप सोडा' अभियानाचा शुभारंभ

**खापरखेडा :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागातर्फे माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त 'अनुसूचित समाज के लोगो, बीजेपी छोड़ो' जनजागृती अभियानाचा शुभारंभ गुरुवारी २० ऑगस्टला सायंकाळी ६ वाजता. खापरखेडा येथील काँग्रेस कार्यालयात होणार आहे. माजी मंत्री सुनील केदार यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून खा. श्यामकुमार बर्वे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रदेशाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध वनकर यांच्या नेतृत्वाखाली हे अभियान महाराष्ट्रातील अनुसूचित जाती समाजात संविधान, सामाजिक न्याय, समता व बंधुतेबाबत जनजागृती करणार आहे. 'संविधान सत्यशोधक जलसा', संगीतमय प्रबोधन, व्याख्याने व सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे हा संदेश ५ लोकसभा व २९ राखीव विधानसभा मतदारसंघांत पोहोचविण्यात येणार आहे. डॉ. वनकर यांनी संविधानप्रेमी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, कलाकार व रसिकांनी खापरखेड्यातील शुभारंभ कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले. या पत्रकार परिषदेला महासचिव राजेश रंगारी, भाऊराव कोकणे, रत्नदीप रंगारी, स्वप्निल पातोडे, नीरज लोणारे, शैलेंद्र बागडे आणि जिल्हाध्यक्ष चोखाद्रे यांच्यासह उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

## शिवाजी सायन्स कॉलेजमध्ये विद्यार्थी दीक्षारंभ




**नागपूर :** शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी आणि रोजगार मिळविण्यापुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांना ज्ञानसंपन्न, कौशल्यपूर्ण आणि जबाबदार नागरिक म्हणून घडविणे हा आहे. महाविद्यालयीन जीवनाच्या सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांनी करिअरचे ध्येय निश्चित करून अभ्यासासोबत व्यक्तिमत्त्व विकासाच्या विविध संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन नागपूर येथील आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे व सायबर विभागाचे पोलीस उपायुक्त दीपक अग्रवाल (आईपीएस) यांनी केले. श्री शिवाजी सायन्स कॉलेज, नागपूर येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित विद्यार्थी दीक्षारंभ कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओ.एस. देशमुख होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब देशमुख गौरव गीत आणि विद्यापीठ गीत सादर केले. प्राचार्य डॉ. देशमुख यांनी प्रमुख पाहुण्यांचे शाल, स्मृतिचिन्ह व रोपटे देऊन स्वागत केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना अग्रवाल यांनी महाविद्यालयीन जीवनातील प्रत्येक वर्षाचा नियोजनबद्ध उपयोग करण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाच्या एसआईपी समन्वयक डॉ. शरयू घोनमोडे फुलझेले यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा समृद्ध शैक्षणिक वारसा आणि संस्थेचे संस्थापक डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या दूरदृष्टीचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. कार्यक्रमाला नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. व्ही.के. किन्हीकर यांनी कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन केले. एसआईपी सदस्य डॉ. व्ही.आर. किन्हीकर, डॉ. जे.के. गुंजाटे, डॉ. एस.के. सय्यद आणि डॉ. पी.एन. देशमुख यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.




# विविध संस्था संघटनांकडून स्वातंत्र्य दिन साजरा!

### प्रबुद्ध विद्यालय, वकीलपेठ



**नागपूर :** प्रबुद्ध विद्यालय वकील पेठ येथे ८० वा स्वातंत्र्य दिन साजरा केला. मुख्याध्यापक संजय सायरे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अनिलकुमार नागबौद्ध, राजन गोंडाने, सुनील शेंडे, मिलींद रामटेके यांची प्रमुख उपस्थिती होती. वर्ग १० ची विद्यार्थिनी गौरी रामटेके हीने भारत मातेच्या वेशभूषेत भाषण आणि देशभक्ती गीत सादर केले. मुख्याध्यापक संजय सायरे यांनीही अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार बिस्मार्क भिवगडे यांनी केले.



### डॉ. आंबेडकर सामाजिक विकास केंद्र, पांचपावली

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास केंद्राच्या वतीने पांचपावली ठक्करग्राम येथील कार्यालयात भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. केंद्राचे अध्यक्ष प्रा. किशोर बिरला यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी भारतीय इतिहासात बहुजन समाजाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाला अपेक्षित स्थान मिळाले नसल्याची खंत प्रा. बिरला यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाला संयोजक ओमप्रकाश बनाफर, चंद्रपाल सोनटक्के, उमेश पिंपरे, राजेश हाथीबेड, सुनील तुर्केल, राजकुमार खरे, गोविंददास खरे, संजय शेन्दरे, रमेश मतेलकर, उमेश हाडोते, हरि मलिक, मिलन तांबे, महेंद्र मनपिया, राजू मालिक, रमेश हाथीपछेल, हिरालाल बाम्हणे, गिरीश सोनवणे, पंकज सोनटक्के, नितेश समुंद्रे, विनोद सिपाही, बबिता डेलीकर, किरण शेन्दरे, शीतल गौरे, मालती बिरला, पायल पांडे, कल्याणी सांडेकर, रेखा सोनवणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त केंद्राच्या बँक ऑफ महाराष्ट्र बचत खात्याचा Scan & Pay QR कोड वरिष्ठ संयोजकांच्या हस्ते लोकार्पित केला.



### निसर्गराजा फाउंडेशन, मनीषनगर

**नागपूर :** निसर्गराजा फाउंडेशन, मनीषनगर, नागपूरच्या वतीने स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा केला. फाउंडेशनचे अध्यक्ष वामनराव नंदागवळी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमाला सरचिटणीस अभिजित रामटेके, कोषाध्यक्ष युवराज फुलजले, सहसचिव डॉ. सोहन चवरे, माजी सैनिक अधिकारी देविदास ढेपे यांच्यासह फाउंडेशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना अध्यक्ष वामनराव नंदागवळी व अभिजित रामटेके यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी सैनिक अधिकारी देविदास ढेपे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संचालन फाउंडेशनचे सहसचिव डॉ. सोहन चवरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन युवराज फुलझेले यांनी केले.

### सीआयएसएफतर्फे तिरंगा बाईक रॅली



**चंद्रपूर :** सीआयएसएफ युनिट सीएसटीपीएस चंद्रपूर यांच्या वतीने ऊर्जा नगर कॉलनी, सीएसटीपीएस चंद्रपूर येथे तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन केले होते. रॅलीची सुरुवात सीएसटीपीएस प्लांटच्या मुख्य प्रवेशद्वारापासून करण्यात आली. अनिल कथोये, मुख्य अभियंता, सीएसटीपीएस चंद्रपूर यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. यावेळी प्रसाद अवधेशकुमार रामशारिख, उप कमांडंट, सीआयएसएफ, तसेच सीआयएसएफचे अधिकारी व जवान, एमएसएफ, महाजेनको सुरक्षा दल आणि सीएसटीपीएसचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. रॅलीमध्ये सहभागी झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या दुचाकींवर राष्ट्रीय ध्वज ऊर्जा नगर कॉलनीतील विविध भागांतून मार्गक्रमण केले. रॅलीला सर्व सहभागींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या रॅलीच्या माध्यमातून सीआयएसएफने "हर घर तिरंगा" अभियानाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवित राष्ट्रीय ध्वजाचा सन्मान करण्याचे आणि राष्ट्रीय एकतेची भावना दृढ करण्याचे आवाहन केले. सीआयएसएफ, एमएसएफ, महाजेनको सुरक्षा दल आणि सीएसटीपीएस कर्मचारी यांच्या संयुक्त सहभागातून एकता, सामूहिक सहभाग आणि राष्ट्राप्रती जबाबदारीची भावना अधोरेखित झाली. तिरंगा बाईक रॅली शिस्तबद्ध, उत्साहपूर्ण आणि शांततापूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाली. या उपक्रमामुळे ऊर्जा नगर कॉलनीमध्ये देशभक्ती, राष्ट्रीय एकता आणि राष्ट्राभिमानाचा संदेश प्रभावीपणे पोहोचला.

### लोटस पब्लिक स्कूल, म्हाळगीनगर



**नागपूर :** न्यू नेहरू नगर, म्हाळगी नगर चौक, नागपूर येथे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ढोल ताशाच्या गजरात विद्यार्थ्यांची भव्य मिरवणूक काढली. त्यानंतर ध्वजारोहण कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. नाना शेंडे आणि प्रमुख अतिथी हरेश्वर सहारे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष दिनकर वाठोरे, सहसचिव इंजि. रुपराज गौरी, कोषाध्यक्ष शिवदास वासे, प्रा. मधुकर मेश्राम, भुराजी झरबडे, शाळेच्या प्राचार्या कांचनलता नागदेवे, उपप्राचार्या अरुणा डहाके, प्रभारी पायल शंभरकर ई. प्रामुख्याने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून दीपप्रज्वलन केले. त्यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कलागुणांचे सादरीकरण केले. त्यामध्ये छोट्या चिमुकल्या विद्यार्थ्यांची वेशभूषा व देशभक्ती गाण्यावर नृत्य सादरीकरण, देशभक्ती गीत, कविता, भाषणे सादर करण्यात आली. यावेळी प्राचार्या कांचनलता नागदेवे यांनी प्रास्ताविक करून मान्यवरांचे स्वागत केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. नाना शेंडे यांनी समयोचित मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुणे आणि इतर मान्यवरांच्या हस्ते ऑलिम्पियाड स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर रँक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा मानचिन्ह आणि पदक देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन आरती सपकाळे यांनी केले, तर आभार मेघा कडुकर यांनी मानले. यावेळी महेश हरडे, सोनाली खोब्रागडे, प्रज्ञा रामटेके, प्रतिभा अतकरे, सुवर्णा हरले, सुनीता मेश्राम, प्रतीक्षा तामगाडगे, वैशाली राऊत, किरण कुकणकर, ई. शिक्षक वर्ग, तर लक्ष्मी लिल्हारे, अमरज्योती गजभिये ई. शिक्षकेतर कर्मचारी आणि धम्मदिन्ना सार्वजनिक वाचनालयाचा वाचक वर्ग तसेच पालक वर्ग उपस्थित होता.

### बार्टी, पुणे



**पुणे :** भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त बार्टीच्या निबंधक डॉ. सुचिता शिंदे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मु ख या ल या च या प्रांगणात ध्वजारोहण केले. यावेळी विभागप्रमुख रविंद्र कदम, डॉ. बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण, संशोधन सल्लागार माजी न्यायमूर्ती डॉ. यशवंत चावरे यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### स्मृती विद्यालय, ब्राम्हणी



**कळमेश्वर :** दरवर्षीप्रमाणे जो विद्यार्थी वर्ग 10 मध्ये सर्वात जास्त मार्क्स प्राप्त करतो, त्या विद्यार्थ्याच्या पालकांना 15 ऑगस्ट आणि 26 जाने. ला ध्वजारोहनाचा मान देण्यात येतो. यावर्षी प्रतिज्ञा दुर्गेश यादव या मुलींनी हा मान तिच्या आईला सरिता दुर्गेश यादव यांना प्राप्त करून दिला. सरिता दुर्गेश यादव यांच्या हस्ते स्मृती विद्यालय, ब्राम्हणी कळमेश्वर येथे ध्वजारोहन झाले. या कार्यक्रमात शाळेचे संचालक रामचंद्र काळे, नगरसेविका रंजना चालखोर, शाळा व्यस्थापन समिती अध्यक्ष मनीषा बांबल, अनेक माजी विद्यार्थी, पालक उपस्थित होते. सरिता दुर्गेश यादव यांचे हस्ते ध्वजारोहन सोबत राष्ट्रगीत झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी झेंडा गीत, महाराष्ट्र गीत, झाल्यानंतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. यावेळी रंजना चालखोर यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच मनीषा बांबल यांनी शुभेच्छा दिल्या. विकास काळे यांनी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. संचालक रामचंद्र काळे यांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक दिपक तागडे यांनीपण स्वतंत्रदिनाच्या मंगलकामना दिल्या. नंतर देशभक्ती गीतावर कवायत सादर केली. संचालन परतेकी तर आभार प्रीती यांनी पार पाडले.

### लुंबिनी बुध्द विहार, मानकापूर



**नागपूर :** देशाच्या 80 व्या स्वातंत्र दिनानिमित्य मानकापूर येथील लुंबिनी बुद्ध विहार येथे मोठ्या उत्सवात झेंडा वंदन माजी नगरसेवक रघुनाथ मालीकर, घनश्याम मांगे, प्रदेश काँग्रेस कमेटी ओबीसी विभागचे प्रदेश उपाध्यक्ष संजय भिलकर यांच्या शुभ हस्ते झेंडा वंदन केले. सर्वात प्रथम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन केले. याप्रसंगी 10 वी व 12 वी च्या गुणवंत विद्यार्थांचा सन्मान चिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार केला.कार्यक्रमाचे संचालन सुखदेव मनोहरे यांनी केले तर आभार अभिजित कांबळे यांनी केले. याप्रसंगी विहाराचे अध्यक्ष मारोतराव गोडबोले, अमर बागडे, चरणदास बैतुलकर, अशोक बागडे, सुनिल निरंजने, जांभुळकर, टेंभुर्णे, गुड मॉर्निंग योगा क्लबचे पदाधिकारी, युवक, महिला मंडळ प्रामुख्याने उपस्थित होते.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648